सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२३/ 5773 दिनांक - 15 DEC 2023

प्रति,

प्राचार्य/उपसचिव
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये /
शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था/.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ विभागीय कार्यालय, पुणे

विषय- राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत पायाभूत प्रशिक्षण वर्ग घेण्यासाठी अधिका-यांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत **(कालावधी १५ जानेवारी ते १३ फेब्रुवारी ,२०२४)**

संदर्भ- मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचा दिनांक ०७/१२/२०२३ रोजीचा मेल

उपरोक्त संदर्भिय पत्रांचे अवलोकन करावे. सदर पत्रातील सुचनेनुसार आपल्या संस्थेतील पात्र वर्ग अ व वर्ग ब संवर्गातील शिक्षकीय/प्रशासकीय अधिका-यांची माहिती खालील प्रपत्रांत भरुन या कार्यालयांस दिनांक १८/१२/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत est.ropune@gmail.com व desk17@dtemaharashtra.gov.in वर मेलव्दारे पाठवावी.

सदर माहिती उपलब्ध करुन देताना ज्यो शिक्षकीय / प्रशासकीय अधिका-यांनी अद्याप पायाभूत प्रशिक्षण घेतलेले नाही व सदर प्रशिक्षण कालावधीत ज्यांना प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त करणे शक्य होईल अश्याच दोन अधिका-यांची माहिती खालील प्रपत्रांत सादर करावी.

| SR.NO. | Name and designation of Officer | Name of the Institute/Office | Mobile No. | E-mail ID | Principal's Remark | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Permitted | Not Permitted |
| | | | | | | |

सोबत-वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

Gmail Establishment Section <est.ropune@gmail.com>

# राज्य प्रशिक्षण धोरणाअंतर्गत पायाभूत प्रशिक्षण घेण्यासाठी अधिकाऱ्यांची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत... (कालावधी - दिनांक 15 जानेवारी ते 13 फेब्रुवारी, 2024)

2 messages

**DTE Maharashtra** <desk17@dtemaharashtra.gov.in> Thu, Dec 7, 2023 at 3:06 PM
To: Regional Office <rooffice@dtemaharashtra.gov.in>, romumbai REGIONAL OFFICE <romumbai@dtemaharashtra.gov.in>, ronagpur regional office <ronagpur@dtemaharashtra.gov.in>, ronashik regional office <ronashik@dtemaharashtra.gov.in>, roaurangabad regional office <roaurangabad@dtemaharashtra.gov.in>, roamravati regional office <roamravati@dtemaharashtra.gov.in>, "est.ropune" <est.ropune@gmail.com>, RO Pune Technical Education <ropune@dtemaharashtra.gov.in>

दि.२३.०९.२०११ शासन निर्णयातील तरतुदीनुसार संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतनातील वर्ग-अ व वर्ग-ब संवर्गातील शिक्षकीय /प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी **दिनांक १५ जानेवारी ते १३ फेब्रुवारी, २०२४** या कालावधीमध्ये यशदा, पुणे यांचे मार्फत **पायाभूत प्रशिक्षण** (Foundation Course) कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे यशदा, पुणे यांनी कळविले आहे. (सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

त्याअनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, आपल्या विभागाअंतर्गत येणाऱ्या शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतनातील आस्थापनेवर **दिनांक २३ सप्टेंबर, २०११ नंतर** सरळसेवेने नियुक्ती झालेल्या, वर्ग-अ व वर्ग-ब संवर्गातील शिक्षकीय/प्रशासकीय अधिकऱ्यांची माहिती **दिनांक १५ डिसेंबर, २०२३** पर्यंत desk17@dtemaharashtra.gov.in या E-mail Address वर Excel Sheet मध्ये पाठविण्यात यावी.

सदर माहिती उपलब्ध करुन देताना ज्या शिक्षकीय/प्रशासकीय अधिकऱ्यांनी अद्याप पायाभूत प्रशिक्षण घेतलेले नाही व सदर प्रशिक्षण कालावधीत त्यांचे संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुख सदरच्या प्रशिक्षणासाठी त्यांना कार्यमुक्त करु शकतील अशाच किमान १० प्रशिक्षणार्थींची माहिती खालील नमुन्यात **इंग्रजीत** तयार करुन ती प्रथम प्राधान्याने संचालनालयास सादर करावी. (नामनिर्देशित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणार्थींचे यापुर्वी यशदा, पुणे यांचे मार्फत आयोजित **पायाभूत प्रशिक्षण** (Foundation Course) पुर्ण झाले नसेल याची खात्री करण्यात यावी.)

| Sr. No | Name and designation of Officer | Name of the Institute/ Office | Mobile No.* | E-mail ID | Principal's Remark | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | Permitted | Not Permitted |
| | | | | | | |

* सदर प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींचे Whatsapp Number नमूद करण्यात यावेत.

आ/२११-१
१५/१२/२३

कार्यासन क्र. १७/Desk No.17

तंत्रशिक्षण संचालनालय / Directorate of Technical Education,
३, महापालिका मार्ग, एल्फिन्स्टन टेक्निकल हायस्कूल / 3, Mahapalika Marg, Elphinstone Technical Highschool ,
महाराष्ट्र राज्य, मुंबई / Maharashtra State, Mumbai - 400 001
Phone: 022-68597419

Website : https://dte.maharashtra.gov.in

**Nomination Let to DTE.pdf**
252K

**DTE Maharashtra** <desk17@dtemaharashtra.gov.in> Fri, Dec 15, 2023 at 11:17 AM
To: "est.ropune" <est.ropune@gmail.com>

[Quoted text hidden]

**Nomination Let to DTE.pdf**
252K

**क्र. CHD/2023-24/STP/FTP-HTED/006**
**दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२३**

**प्रति,**

**मा. संचालक,**
तंत्र शिक्षण,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई- ४०० ००१

**विषय : राज्य प्रशिक्षण धोरण:**
**तंत्र शिक्षण संचालनालयातील संवर्ग -अ मधील अधिकाऱ्यांकरिता पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम**
नामनिर्देशने पाठविण्याबाबत ...

**संदर्भ :** १) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. टीआरएन- ०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि. २३ सप्टेंबर, २०११
२) अधिसूचना, महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग ४-अ, गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ३-९,२०२२/माघ १४-२०, शके १९४३, दिनांक २ फेब्रुवारी, २०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ शासन निर्णयानुसार तसेच संदर्भ क्रमांक २ नुसार नवनियुक्त शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता "पायाभूत प्रशिक्षण" कार्यक्रम अनिवार्य आहे.

०२. यशदातर्फे दिनांक १५ जानेवारी २०२४ ते १३ फेब्रुवारी, २०२४ या कालावधीत एकूण ४० अधिकाऱ्यांसाठी (प्रशिक्षणार्थीसाठी) पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

०३. या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी शासन सेवेत २३ सप्टेंबर, २०११ नंतर रुजू झालेल्या प्रशासकीय तसेच अध्यापकीय एकूण ४० अधिकाऱ्यांची (प्रशिक्षणार्थ्यांची) नामनिर्देशने करून आपल्या स्तरावरून उपस्थित राहण्याचे आदेश व्हावेत, ही विनंती.

०४. या प्रशिक्षणामध्ये उपस्थित राहणाऱ्या अधिका-यांची (प्रशिक्षणार्थ्यांची) यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे-४११ ००७ येथे निवासाची व भोजनाची व्यवस्था आरक्षित करण्यात आलेली आहे. प्रशिक्षण कार्यक्रम दिनांक १५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ०९:३० वाजता सुरु होईल. तत्पूर्वी सदर प्रशिक्षणार्थीना उपस्थित राहण्याच्या सूचना व्हाव्यात, ही विनंती. तसेच या अधिकाऱ्यांची यादी Whatsapp Number सह यशदास दिनांक १५ डिसेंबर, २०२३ पर्यंत पाठविण्यात यावी, ही विनंती.

०५.	यशदातर्फे प्रशिक्षणार्थींचा Whatsapp Group तयार करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींना या ग्रुपवर सर्व सूचना देण्यात येतील.

०६.	अधिका-यांना (प्रशिक्षणार्थ्यांना) प्रशिक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने काही माहिती हवी असल्यास माझे सहकारी श्री. विजय चव्हाण (दूरध्वनी:०२०-२५६०८२२३, भ्रमणध्वनी :८७८८११९७४९, मेल:vijay.chavan@yashada.org) यांच्याशी संपर्क साधण्यास कळवावे, ही विनंती.

**आपला विश्वासू,**

VINAYKUMAR SHASHIKANT KULKARNI

Digitally signed by VINAYKUMAR SHASHIKANT KULKARNI
Date: 2023.11.24 08:41:43 +05'30'

**(विनय कुलकर्णी)**
प्रशिक्षण व्यवस्थापक, मानव विकास केंद्र, यशदा तथा सत्र संचालक